## ज्ञात-अज्ञात - भाग १

``हॅपी जर्नी! टेक केअर. लगेज चेक इन् करून झालं की फोन कर हं! विसरू नकोस. काळजी घे स्वत:ची.''

``आणि हो, विमानात बसलीस की मोबाईल बंद करण्याआधी पुन्हा एकदा फोन कर बरं का! आम्ही जागेच असू तोपर्यंत. पासपोर्ट नीट सांभाळून ठेव. नीट जा. तिकडे पोचलीस की एअरपोर्टवरून रियाच्या मोबाईलवरून फोन कर लगेच. अगं, एकटीच चाललीयस ना, म्हणून काळजी वाटते.''

ऐंशी वर्षाची आई एअरपोर्टच्या बाहेर मला - तिच्या पंचावन्न वर्षाच्या मुलीला हे सगळं परत परत सांगत होती. तिच्या दाटून आलेल्या मायेच्या कंठातली काळजी मला कळत होती.

आईच्या डोळ्यातून पाझरणारी माया गालावर ओघळलीच. मीही माझ्या लेकीसाठी - तिच्या मायेपोटीच तर अशी एकटी गडबडीने निघाले होते ना?

``आई, असं गं काय? अगं, अमेरिकेला जायची ही काय माझी पहिलीच वेळ आहे का? बत्तीस वर्षांपूर्वी पहिल्यांदा चालले होते त्यावेळीही तू, बाबा तुम्ही सगळे असेच निरोप द्यायला आला होतात. तेव्हाही तू असंच सगळं सांगितलं होतंस. माझ्या चांगलं लक्षात आहे अजून. पण आज मी तुझ्या नातीच्या ग्रॅज्युएशन सेरिमनीसाठी चाललेय. तुझी नात-माझी लेक-तिला भेटायला मी चाललेय. तू अजिबात काळजी करू नकोस.''

``आईची माया असते ती. लेकीला भेटल्यावर तुलाही कळेलच ते.'' आई काहीसं मनाशी, काहीसं कळेल न कळेलसं पुटपुटली. आशूने-माझ्या बहिणीने तिला हात धरून बाजूला घेतलं.

सगळ्यांना बाय करून मी ट्रॉली घेऊन आत गेले, आणि मनात रियाचे विचार चालू झाले. बाहेर होते तेव्हा बाकीच्यांचे विचार, आईची काळजी... पण आता एअरपोर्टला आत शिरल्या शिरल्या मी त्या सगळ्यांपासून वेगळी झाले होते. आता मी फक्त आणि फक्त रियाची आई होते. दुसरी सगळी नाती माझ्यापासून अलग झाली होती. रिया-माझी लेक-माझं बच्चू! दोन वर्षांपूर्वी M.S. करायला ती U.S.A ला गेली होती. तिचं ग्रॅज्युएशन पूर्ण होऊन तिला तिथल्या युनिव्हर्सिटीची पदवी मिळणार होती. तिच्या कॉनव्होकेशन सेरिमनीसाठीच मी चालले होते. खरं तर हे आणि मी एकत्रच जाणार होतो. पण ह्यांना हॉस्पिटलमधून तीन आठवड्यापेक्षा जास्त रजा मिळत नव्हती. पेशंटस, त्यांच्या

केसेस. त्यामुळे रियानेच सुचवलं, ``आई तू एकटी अगोदर ये. एक-दीड महिना आधी आलीस तर आपण दोघी भरपूर गप्पा मारू. थोडं हिंडू-फिरू. धम्माल करू आणि मला तुला एक सरप्राईझ द्यायचंय. तू ये बाबांच्या आधी. कॉन्व्होकेशनच्या वेळी बाबा येतील आणि जाताना तुम्ही बरोबर जा परत. नॉनस्टॉप फ्लाईटने आलीस की तसा प्रश्न नाही. हं. तुला ऍट-अ स्ट्रेच सोळा सतरा तास विमानात बसावं लागेल. तेवढाच काय तो त्रास. पण आई, ये गं तू आधीच. मला पण दोन वर्षात तुम्ही कुणी भेटला नाहीत. त्यामुळे तुमच्याशी आणि खास करून तुझ्याशी तर एवढ्या गप्पा मारायच्या साठल्यात ना. कधी तुला हे सांगते असं झालंय.'' तिच्या स्वरातील भावना माझ्यापर्यंत पोचलीच. ``काय गं? काही खास... कसलं सरप्राईझ सांग तरी.'' मी असं विचारल्यावर ती पुढे म्हणाली होती, ``ममा, आय ऍम इन लव्ह. रॅन - रॅन नाव आहे त्याचं. तू इकडे ये. त्याला भेट, त्याच्याशी बोल. कसला साधा आहे गं तो. मला नक्की खात्री आहे, तुला पण तो जावई म्हणून नक्कीच आवडेल. मग आपण बाबांशी बोलू. तू बाबांना आधी काही सांगू नकोस. तू तुझं मत सांग. ममा, आय ऍम शुअर, तुला रॅन आवडेलच. मग बाबांना तू पटव. कारण अजून वर्ष - दीड वर्ष तरी मी इंडियाला येणार नाहीये.'' किती कॉन्फिडेंटली रिया मला हे सांगत होती.

माझ्या कानात रियाचे शब्द घुमत होते. ``ममा, आय ऍम इन लव्ह!'' रॅन- कोण कसा असेल तो? त्याचे आई बाबा कोण? आणखी भावंडं कोण? किती? कुठला आहे तो? फोनवर रिया फक्त एवढंच म्हणाली होती,``डोन्ट वरी ममा. त्याचे आई-बाबा इंडियनच आहेत. पण तो मात्र born and brought up इथला आहे. वी विल टॉक अबाऊट हिम लेटर.'' फक्त इंडियन आहे म्हणाली असली तरी नक्की कोण - कॅथलिक, पंजाबी, गुजराती, साऊथ इंडियन, नॉर्थ इंडियन का मुस्लिम काही कळायला मार्ग नाही. दुसऱ्या जाती-धर्माचा असला तर त्यांच्या चालीरीती, संस्कार सर्व जमवून घ्यायचं म्हणजे... आपण कितीही शिकलेले, पुढारलेले असलो तरी अजूनही लग्न ह्या विषयावर आपला पुरोगामीपणा संकुचितच आहे. पण आधी मला भेटू दे रॅनला. मग ह्या पुढच्या गोष्टी. तिला फोनवर विचारायचा एक-दोनदा प्रयत्न केला होता मी. पण पठ्ठीने ताकास सूर लागू दिली नाही. तिच्या अभ्यासात डिस्टर्ब नको म्हणून मग मी पण रॅनचा विषय पुन्हा काढला नाही.

एअरपोर्टवर वेटिंगमध्ये बराच वेळ झाला होता. घड्याळात पाहिलं, अजूनही दीड-एक तास शिल्लक होता. एव्हाना पॅसेंजर्सची गर्दी बऱ्यापैकी वाढली होती. मी घड्याळाकडे आणि अनाउन्समेंटकडे लक्ष ठेवून होते. अनाउन्समेंट झाल्यावर सिक्युरिटी चेक इन करून तिकडे जाऊन

बसले. तरीही अजून बराच वेळ होता. मनात रियाच्या लहानपणीच्या सर्व आठवणी फुलपाखरासारख्या फेर धरून नाचत होत्या. त्या आठवणींना खंड नव्हता. कधी सरलं हिचं बालपण...

विचारांच्या तंद्रीत हरवलेल्या मला लक्षात आलं, अनाऊन्समेंट होऊन लोक आपल्या आपल्या रोप्रमाणे उभे आहेत. मीही मग पासपोर्ट-तिकीट हातात ठेऊन पर्स आणि हॅन्डबॅग घेऊन रोमध्ये उभी राहिले. हसत हसत स्वागत करत असलेल्या एअर होस्टेसच्या अभिवादनाचा स्वीकार करत विमानात शिरले. माझी सीट शोधून सीटवर बसले. रियाला मेसेज टाकला. आणि तिचा लगेच रिप्लायही आला `Oh! wow, excited... eager to meet u'. मी मोबाईल switch off करून पर्समध्ये ठेवला.

सीटवर रिलॅक्स होऊन बसल्यावर भूतकाळाच्या आठवणींनी मनात फेर धरला. बत्तीस-तेहतीस वर्षांपूर्वीची आठवण - इंजिनियरिंग करून मास्टर्स करायला मी अमेरिकेला निघाले होते. तेव्हाची आठवण आली. सोबत माझ्या दोन सख्ख्या मैत्रिणीही होत्या. विनिता आणि सत्यवती. आम्ही तिघींनी एकाच वेळी फॉर्म्स भरले होते आणि विशेष म्हणजे तिघींनाही एकाच कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली होती. आम्ही तिघी आमच्या स्वप्नपूर्तीकडे-ध्येयपूर्तीकडे निघालो त्यावेळी मनाने अक्षरशः गरुडभरारी घेतली होती. औत्सुक्य, उत्कंठा, अचंबा आणि अभिमान सगळ्या भावना एकाच वेळी दाटून आल्या होत्या. कशी असेल अमेरिका? आम्ही खूपच एक्सायटेड होतो. JFK एअरपोर्टवर उतरलो. तिथून टॅक्सी करून MIT युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमध्ये पोचलो. आमचं रूटीन सुरू झालं. युनिव्हर्सिटीचा कॅम्पस खूपच मोठ्ठा आहे. त्यामुळे सुरवातीला कुठे काय आहे, कुठलं लेक्चर कुठल्या क्लासमध्ये आहे सर्व कळायला बराच वेळ गेला. तिथल्या लोकांचे ॲक्सेंट्सही वेगळे. पण हळूहळू आम्ही सारं आत्मसात करत होतो. बरेचसे सिनियर्सही आम्हाला खूप मदत करायचे. तिथलं कल्चरच खूप वेगळं होतं.

असाच एकदा निनाद भेटला. माझ्याच कॉलेजमध्ये. मला एक वर्ष सिनियर. त्या दिवशी मी एकटीच ग्रोसरीसाठी चालले होते. विनी आणि सती - विनीताचं विनी आणि सत्यवतीचं सती हे इथल्या क्लासमेट्सनी केलेलं नामांतर - तर त्या दोघीही बरोबर नव्हत्या. मी एकटीच बसस्टॉपच्या दिशेने निघाले होते आणि तेवढ्यात बाजूने आवाज आला, ``हाय! निनाद. टुडे युवर फ्रेंडस आर नॉट विथ यू? गोईंग अलोन?'' त्याने शेकहँडसाठी हात पुढे केला होता. गोंधळून गेलेल्या मी त्याला शेकहॅन्ड करताना माझ्या हातातली पुस्तकं खाली पडली. नोट्स लिहिलेले काही पेपर्सही इकडे तिकडे विखुरले,

आणि आम्ही दोघांनी ते गोळा करताना त्यातले दोन पेपर्स फाटले. ``आय ॲम सो सॉरी! मी हे पुन्हा दुसऱ्या कागदावर लिहून उद्या तुला दिले तर चालेल?'' तो शुद्ध मराठीत आणि अगदी प्रामाणिकपणे विचारत होता. त्याच्या डोळ्यातल्या निरागसतेने मला हसू फुटलं होतं. निनादची माझी ही पहिली भेट... आणि त्यानंतर त्या भेटी वाढतच गेल्या. आम्ही दोघं एकमेकांच्या प्रेमात पडलो. एकत्र हिंडणं, हॉटेलिंग, जमलंच तर कधी पिक्चर पहाणं असं चालू झालं. अभ्यास तर होताच. निनादचं मास्टर्स पूर्ण होऊन तो मोठ्या कंपनीत नोकरीला लागला होता.

माझं लास्ट सेमिस्टर बाकी होतं. शिकता शिकताच इथे जॉबही करावा लागतो. लेक्चर्स, जॉब, अभ्यास, जेवण बनवणं आणि शनिवारी वीक-एन्डची कामं ह्या सगळ्यातून आम्हाला दोघांना भेटायला फक्त एक रविवारच मिळत असे. निनादच्या कारमधून रविवारी आम्ही भरपूर भटकायचो. पण तेवढ्याने आठवडाभराच्या विरहाचे समाधान होत नव्हते. निनादचा रूम पार्टनर दुसरीकडे शिफ्ट होणार होता. आमच्या दोघांच्याही मनात एकच विचार आला. आपण दोघं एकत्र राहिलो तर? निनाद रोज सकाळी मला कॉलेजला ड्रॉप करेल. संध्याकाळी माझी मी बसने येईन. माझी लेक्चर्स, जॉब, अभ्यास सगळ्याचा मेळ बसणार होता. पण अजून आम्ही दोघांनीही इंडियाला आपआपल्या घरी आमच्या प्रेमाबद्दल काही सांगितलं नव्हतं. माझं पोस्ट ग्रॅज्युएशन झाल्यानंतर सांगणार होतो. दोघांच्याही घरून विरोध असण्यासारखं काही नव्हतंच. आम्ही लग्न करणार होतोच. पण हे लिव्ह इन रिलेशनशिप म्हणजे - बत्तीस, चौतीस वर्षापूर्वी ही कल्पना आमच्या दोघांच्या मनाला पचायलाही जिथे जड जात होती, तिथे आमच्या दोघांच्या घरच्यांची तर गोष्टच नको.

पण अमेरिकेत मात्र त्यावेळीही ह्या गोष्टी सहज घेतल्या जात होत्या. तिथली संस्कृती, वातावरण सारं वेगळंच आहे. तुम्ही काहीही करा. लोक तुमच्या खाजगी आयुष्यात डोकावत नाहीत की त्याचा डांगोरा पिटत बसत नाहीत. सुरवातीला माझ्या मैत्रिणी विनी आणि सतीलाही हे अतर्क्य वाटलं. पण मी आणि निनादने आमचे मुद्दे नीट मांडल्यावर आमच्या घरच्यांना स्वतःहून काही न सांगण्याच्या बोलीवर त्यांनी आमच्या प्रस्तावाला मान्यता दिली. सहा-सात महिन्यांचाच तर प्रश्न होता.

(क्रमशः)

**लीना माटे**